सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)


**संदर्भ क्र. विविमं/२०२५-२६/४३३** **दि. १७/१२/२०२५**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित**
**सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,**
**विद्यापीठ परिसरातील सर्व विभाग,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.**

**विषय : दि. १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ : मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग पुणे यांचे जा.क्र. ससं/उशि/पुवि/परिपत्रक/२०२५/ई२४७५१११ दि. १६ डिसेंबर, २०२५ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

संयुक्त राष्ट्रांनी दि. १८ डिसेंबर १९९२ रोजी राष्ट्रीय, वांषिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांकांच्या हक्काचा जाहीरनामा स्विकृत करून प्रस्तृत केला आहे. त्यानुसार, दरवर्षी १८ डिसेंबर हा अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यास अनुसरून अल्पसंख्याक विकास महाराष्ट्र शासन यांनी १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून साजरा करण्याच्या सुचना दिल्या आहेत. तसेच अल्पसंख्यांक दिवसाच्या निमित्ताने अल्पसंख्यकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्काबाबत जाणीव करून देण्याकरिता विविध कार्यक्रम आयोजित करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

अल्पसंख्याक नागरिकांना त्यांच्या घटनात्मक व कायदेशीर हक्कांची जाणीव/माहिती करून देण्यासाठी विविध कार्यक्रम/उपक्रमांचे आयोजन करून अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा करण्याबाबत शासनाने निर्देश दिले आहेत. महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार गुरुवार दि. १८ डिसेंबर, २०२५ रोजी आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागांमध्ये विविध कार्यक्रम/उपक्रमांचे काटेकोरपणे आयोजन करून “अल्पसंख्याक हक्क दिवस” म्हणून साजरा करावा. या संबंधीचे सविस्तर पत्र, आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिका, नगरपरिषद, व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका २०२५ ची आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. याबाबत निवडणूक आयोगाने दि. ४.११.२०२५ रोजी आदेश निर्गमित केले आहे. राज्य निवडणूक आयोगाचे सदर आदेश विचारात घेऊन अल्पसंख्याक हक्क दिवशी सदर कार्यक्रमांचे आयोजन करतांना आचारसंहितेचा भंग होणार नाही याची तसेच या कार्यक्रमास राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी/प्रतिनिधी उपस्थित राहणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी. सदर कार्यक्रमाचे आयोजन करताना आदर्श आचारसंहितेचा कोणताही भंग होणार नाही तसेच याबाबत शासनाच्या प्राप्त निर्देशांचे तंतोतंत पालन होईल याची नोंद घ्यावी.

सदर उपक्रम विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून यशस्वी करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना सूचित करण्यात यावे. कळावे ही विनंती.

**(डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग,**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१**

**Web-www.jdhepune.in** **E-mail:jdhepune@gmail.com**

फोननं. ०२०-२६१२७८३३, २६०५१६३२, फॅक्सनं. ०२०-२६१२७८३३

जा.क्र.ससं/उशि/पुवि/ परिपत्रक/२०२५/ई 2475111 दि. १६-१२-२०२५

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
३. कुलसचिव, सर्व अकृर्षि अभिमत व खाजगी विद्यापीठे/संस्था, पुणे विभाग.
४. प्राचार्य /प्राचार्य, अशासकीय अनुदानित/कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, समाजकार्य, व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये, **पुणे,अहिल्यानगर व नाशिक जिल्हे.**

**विषय : दिनांक १८ डिसेंबर हा दिवस "अल्पसंख्यांक हक्क दिवस" म्हणून साजरा करणेबाबत.**

संदर्भः मा. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडील पत्र क्र. जिनिसपु/नि-१०/ अल्पसंख्यांक कक्ष/२०२५-२६/२४८९, दि. १५-१२-२०२५ व दि. ११-१२-२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत मा. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडील दि. १५-१२-२०२५ व दि. ११-१२-२०२५ चे पत्र व सहपत्रान्वये दिनांक १८ डिसेबर हा दिवस 'अल्पसंख्याक हक्क दिवस' म्हणून साजरा करण्याबाबत कळविलेले आहे.

सद्यस्थितीत मा. राज्य निवडणूक आयोगामार्फत आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. तसेच सर्दर्भिय पत्रानुसार आचारसंहितेचा कोणताही भंग होणार नाही याची तसेच सदर कार्यक्रमास कोणत्याही राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार नाहीत याची दक्षता घेऊन अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्याअनुषंगाने विभागातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये 'अल्पसंख्याक हक्क दिवस' या कार्यकमाची अंमलबजावणी करुन संदर्भिय पत्रानुसार विविध उपक्रम आयोजित करावेत. तसेच सदर कार्यक्रमाचे आयोजन करताना आदर्श आचारसंहितेचा कोणताही भंग होणार नाही तसेच सहपत्रान्वये प्राप्त निर्देशांचे तंतोतंत पालन होईल याची नोंद घ्यावी.

**सोबत :** संदर्भिय पत्र व सहपत्रातील सूचनांचे पालन करून आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 17-12-2025
13:23:50

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

**प्रत :** मा. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हा नियोजन समिती,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

ई-मेल : dpopune85@gmail.com दूरध्वनी : (020) 26121012

क्र. जिनिसपु/नि-10/अल्पसंख्यांक कक्ष/2025-26 /२४८९ दिनांक: १५ /12/2025

**प्रति,**

१. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे
२. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद प्राथमिक/माध्यमिक, पुणे
३. शिक्षणाधिकारी प्राथमिक/ माध्यमिक, पुणे महानगरपालिका
४. शिक्षणाधिकारी प्राथमिक/ माध्यमिक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**विषय: दिनांक १८ डिसेंबर हा दिवस "अल्पसंख्यांक हक्क दिवस" म्हणून साजरा करणेबाबत.**

संदर्भ: १) या कार्यालयाचे पत्र क्र. २४३३ दि. ११/१२/२०२५
२) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग, मुंबई यांचे पत्र क्र. राअआ/अ.ह.दि./प्र.क्र.५३९/२०२५/का.३ दिनांक: ११/१२/२०२५

संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये दिनांक १८ डिसेंबर हा दिवस 'अल्पसंख्याक हक्क दिवस' म्हणून साजरा करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत पुणे जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका–2025 च्या अनुषंगाने मा. राज्य निवडणूक आयोगामार्फत आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. तसेच मा. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे संदर्भ क्र. 2 मधील पत्रानुसार, आचारसंहितेचा कोणताही भंग होणार नाही याची तसेच सदर कार्यक्रमास कोणत्याही राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार नाहीत याची दक्षता घेऊन 'अल्पसंख्यांक हक्क दिवस' साजरा करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

तरी, सदर कार्यक्रमाचे आयोजन करताना आदर्श आचारसंहितेचा कोणताही भंग होणार नाही तसेच संदर्भ क्र. २ अन्वये प्राप्त निर्देशांचे तंतोतंत पालन होईल याची नोंद घ्यावी. सोबत मा.अल्पसंख्यांक आयोग यांच्या पत्राची प्रत संलग्न करण्यात येत आहे.

वरील सूचनांचे पालन करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

(किरण इंदलकर)
जिल्हा नियोजन अधिकारी तथा
जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

प्रत:१. मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव
२. स्वीय सहायक, मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालया, पुणे यांना माहितीस्तव

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग
बद्रुद्दीन तय्यबजी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनस जवळ, जे.जे.स्कुल ऑफ आर्टसच्या मागे, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी क्र. ०२२-२२६१०१५६/२२६५००८५ Emai smc_mah2000@yahoo.com

---

राअआ/अ.ह.दि./प्र.क्र. ५३९ /२०२५/का.३ दि. ११.१२.२०२५

प्रति,

**जिल्हाधिकारी,**
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
सर्व जिल्हे.

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
जिल्हा परिषद
सर्व जिल्हे.

**विषय : दि. १८ डिसेंबर, हा अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ :** १) शासन पत्र, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. अहदि-२०१४/ प्र.क्र.७८/का.८, दि. १४ नोव्हेंबर, २०१४.
२) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. अविवि-२०२५/ प्र.क्र.६१/का.८, दि. २१ नोव्हेंबर, २०२५.
३) शासन परिपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग क्र.अविवि-२०२५/ प्र.क्र. ६० /का.८, दि. १०.१२.२०२५

**महोदय,**

संयुक्त राष्ट्रांनी दि १८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्कांचा जाहीरनामा स्वीकृत करुन प्रस्तूत केला आहे. त्यानुसार दरवर्षी १८ डिसेंबर हा आंतरराष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा केला जातो.

त्यास अनुसरुन अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी देखील १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा करण्याच्या सूचना संदर्भ क्र. ३. वरील परिपत्रकान्वये दिल्या आहेत. तसेच सदर दिवसाच्या निमित्ताने अल्पसंख्याकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशिर हक्काबाबत जाणिव करुन देणे या करिता विविध कार्यक्रम आयोजित करण्याबाबत सूचित केले आहे.

सर्व जिल्हयात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी शाळा व महाविद्यालय या मध्ये अशासकीय समाजसेवी संस्थांच्या मदतीने सामाजिक कार्यकर्ते स्वयंसेवी गट व विद्यार्थी यांच्याकरिता विविध

कार्यक्रम आयोजित करावे तसेच खालीलप्रमाणे स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. तसेच सदर कार्यक्रमातील विजेत्यांना पारितोषिके देण्यात यावीत.

१) इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांकरिता भित्ती पत्र स्पर्धा आणि निबंध स्पर्धा.
२) इयत्ता ११ वी ते पदवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा आणि व्याख्यानमाला चर्चासत्र/परिसंवाद इत्यादींचे आयोजन.

जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत समाजसेवी संस्थांच्या आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्या मदतीने अल्पसंख्याक समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींना आमंत्रित करुन अल्पसंख्याक नागरिकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशिर हक्काची जाणिव /माहिती देण्यासाठी कार्यक्रम आयोजित करण्याकरिता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांनी स्पर्धा आयोजित केल्यास त्यांना प्रत्येकी रु.१०,०००/- (रु. दहा हजार फक्त) मर्यादेत अनुदान वितरित करण्यात येईल. तसेच सर्व जिल्हाधिकारी यांनी देखील कार्यक्रम आयोजित केल्यास प्रत्येकी रु.१०,०००/- (रु. दहा हजार फक्त) मर्यादेत अनुदान वितरित करण्यात येईल. नमूद मर्यादेत खर्च करुन झालेल्या खर्चाचा तपशील (जिल्हाधिकारी कार्यालय आणि शिक्षणाधिकारी यांचा) आयोगास पाठवावा. सदर खर्चाचा तपशील आणि मुळ देयक प्राप्त झाल्यानंतरच आयोगामार्फत सदर खर्चाची प्रतीपुर्ती करण्यात येईल.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये उपरोक्त नमूद केलेल्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी आणि नियोजनासाठी **मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक जिल्हास्तरीय समितीची स्थापना करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार जिल्हयात हा उपक्रम व्यापक प्रमाणात राबविण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांचेवर राहील.**

*सद्यस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका २०२५ ची आदर्श आचारसंहिता लागू आहे. याबाबत निवडणूक आयोगाने दि:४.११.२०२५ रोजी आदेश निर्गमित केले आहे. राज्य निवडणूक आयोगाचे सदर आदेश विचारात घेऊन अल्पसंख्याक हक्क दिवशी सदर कार्यक्रमाचे आयोजन करतांना आचारसंहितेचा भंग होणार नाही याची तसेच या कार्यक्रमास राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी/प्रतिनिधी उपस्थित राहणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी.*

अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा करुन त्याबाबतीतील आपला अहवाल आयोगास विहित मुदतीत न चुकता पाठवावा, अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

**(सारंगकुमार पाटील)**
**सचिव**

प्रत : माहितीसाठी.

मा. सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्तांचे कार्यालय,

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हा नियोजन समिती,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

ई-मेल : dpopune85@gmail.com दूरध्वनी : (020) 26121012

क्र. जिनिसपु/नि-१०/अल्पसंख्यांक कक्ष/२०२५-२६/२४३३ दिनांक ११/१२/२०२५

**प्रति,**

१. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे
२. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद प्राथमिक/माध्यमिक, पुणे
३. शिक्षणाधिकारी प्राथमिक/ माध्यमिक, पुणे महानगरपालिका, पुणे
४. शिक्षणाधिकारी प्राथमिक/ माध्यमिक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे

**विषय: दिनांक १८ डिसेंबर हा दिवस "अल्पसंख्यांक हक्क दिवस" म्हणून साजरा करणेबाबत.**
संदर्भ: अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.अविवि – २०२४/प्र.क्र.५१/का.८, दि.१६.१२.२०२४,

संदर्भीय शासन परिपत्रकानुसार, जिल्ह्यातील सर्व शाळा/महाविद्यालयांमध्ये अशासकीय समाजसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी गट तसेच विद्यार्थी यांच्या सहभागातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करून दिनांक १८ डिसेंबर हा दिवस 'अल्पसंख्यांक हक्क दिवस' म्हणून साजरा करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

तरी, आपल्या नियंत्रणाखालील सर्व शाळा/महाविद्यालयांना निर्देश देऊन 'अल्पसंख्यांक हक्क दिवस' साजरा करण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच, पुणे जिल्ह्यातील नगरपरिषदा व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुका – २०२५ लक्षात घेता, मा. राज्य निवडणूक आयोगामार्फत जारी करण्यात आलेल्या आदर्श आचारसंहिता (MCC) मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन केले जाईल याची खात्री करावी. कोणत्याही प्रकारे आचारसंहितेचा भंग होणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी.

वरील कार्यक्रमाची अंमलबजावणी करून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रत्येक शाळा व महाविद्यालयांनी अशासकीय समाजसेवी संस्थांच्या सहकार्याने पुढीलप्रमाणे उपक्रम आयोजित करावेत:

१. जागृती कार्यक्रम, व्याख्यानमाला, चर्चासत्रे, परिसंवाद व मार्गदर्शन सत्रे.
२. भित्तीपत्रक, निबंध, वक्तृत्व, चित्रकला इत्यादी शालेय स्पर्धांचे आयोजन व बक्षिसांचे वितरण.
३. सामाजिक संघटना व स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने जनजागृती उपक्रम.
४. विद्यार्थ्यांचा सक्रीय सहभाग सुनिश्चित करणे.

सोबत: शासन परिपत्रक

(किरण इंदलकर)
जिल्हा नियोजन अधिकारी तथा
जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी, पुणे

प्रत: १. मा.उप सचिव, महाराष्ट्र शासन, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.
२.स्वीय सहायक, मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव.

दिनांक १८ डिसेंबर हा दिवस "अल्पसंख्याक हक्क दिवस" म्हणून साजरा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः अविवि - २०२४/प्र.क्र. ५१/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६ डिसेंबर, २०२४

**प्रस्तावना -**

संयुक्त राष्ट्र संघटनेने दि.१८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्काचा जाहीरनामा स्विकृत करुन प्रस्तृत केला आहे. त्यानुसार अल्पसंख्याक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादींचे संवर्धन करता यावे, तसेच याबाबतचे वैशिष्ट्यांची प्रभावीपणे अभिव्यक्ती करता यावी याद्दष्टीने प्रयत्न करण्याबाबत राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाने सूचना दिल्या आहेत. दि.१८ डिसेंबर हा दिवस "अल्पसंख्याक हक्क दिवस" म्हणून महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत राबविण्यात येतो.

**शासन परिपत्रक -**

दिनांक १८ डिसेंबर हा दिवस राज्यपातळीवर प्रतिवर्षी "अल्पसंख्याक हक्क दिवस" म्हणून साजरा करण्यात यावा. याद्दष्टीने या दिनांकास खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत:-

१. अल्पसंख्याक नागरिकांना त्यांच्या घटनात्मक व कायदेशीर हक्कांची जाणीव/माहिती देण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

२. सर्व जिल्हयात शाळा व महाविद्यालयांमध्ये अशासकीय समाजसेवी संस्थांच्या मदतीने सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी गट व विद्यार्थी यांच्याकरिता विविध कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. यामध्ये खालील बाबींचा समावेश असावा :-

अ)भित्तीपत्र स्पर्धा
ब) वक्तृत्व स्पर्धा
क) निबंध स्पर्धा
ड) उपरोक्त कार्यक्रमातील विजेत्यांना पारितोषिके
इ) व्याख्यानमाला, चर्चासत्र, परिसंवाद इ.

३. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत अल्पसंख्याकांसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांना मेळावे, चर्चासत्रे इत्यादीद्वारे प्रसिध्दी देण्यात यावी.

४. राज्यात हा उपक्रम व्यापक प्रमाणात राबविण्यासाठी सर्व जिल्हयात सूचना देणे कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणे, कार्यक्रमांचे आयोजन मार्गदर्शन करणे इत्यादी जबाबदारी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाची राहील. तसेच जिल्हयात हा उपक्रम व्यापक प्रमाणात राबविण्याची जबाबदारी सर्व जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात येत आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास शासनाकडून, "मागणी क्र. झेड ई-१, मुख्य लेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाज

कल्याण २०० व इतर कार्यक्रम २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनेंतर्गत योजना (०१) अल्पसंख्याकांना सहाय्य (०१) (१२) संशोधन, प्रशिक्षण व योजनांना प्रसिध्दी याकरिता सहायक अनुदान (२२३५-ए-१८७) ३१, सहायक अनुदान" या लेखाशिर्षाखाली प्रतिवर्षी देण्यात येणाऱ्या अनुदानातून रु.१०.०० लक्ष इतक्या मर्यादेत खर्च करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

५. उपरोक्त सूचनांआधारे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अहवाल सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग व जिल्हाधिकारी यांनी शासनास प्रतिवर्षी सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२४१२१६१२२६३८२३१४ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MILIND PADMANABH SHENOY

Digitally signed by MILIND PADMANABH SHENOY
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=a45302e7bc40cf2fa6a43ca3b215a6542fc92b8f9949596 80f52a7ae3a293948, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F493AF30AF7B26C53298AE259841E86E19698EE E98D45062557024086F38989, cn=MILIND PADMANABH SHENOY
Date: 2024.12.16 12:27:24 +05'30'

(मिलिंद शेणॉय)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. विरोधी पक्षनेता, विधानसभा व विधापरिषद यांचे खाजगी सचिव,
५. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई
६. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
८. सर्व विभागीय आयुक्त
९. सर्व जिल्हाधिकारी
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११. सहसचिव/ उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सहसचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई
१४. व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई
१५. निवड नस्ती, का.८

**अल्पसंख्याक हक्क दिवस व्यापक प्रमाणात साजरा करण्याकरीता समिती स्थापन करण्याबाबत**

---

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : अविवि-२०२५/प्र.क्र.६१/का-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
**दिनांक : २१ नोव्हेंबर, २०२५**

<u>वाचा</u> :- अल्पसंख्याक विकास विभाग, शासन पत्र क्र. अहदि-२०१४/प्र.क्र.७८/का-८,
दि. १४ नोव्हेंबर २०१४ व दि. ३० डिसेंबर, २०१५

<u>प्रस्तावना :-</u>

संयुक्त राष्ट्र संघटनेने दि.१८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्काचा जाहीरनामा स्विकृत करुन प्रस्तृत केला आहे. त्यानुसार अल्पसंख्याक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादींचे संवर्धन करता यावे, तसेच याबाबतचे वैशिष्ट्यांची प्रभावीपणे अभिव्यक्ती करता यावी यादृष्टीने प्रयत्न करण्याबाबत राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाने सूचना दिल्या आहेत. दि.१८ डिसेंबर हा दिवस "अल्पसंख्याक हक्क दिवस" म्हणून महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत राबविण्यात येतो. दिनांक १८ डिसेंबर हा दिवस राज्यपातळीवर प्रतिवर्षी "अल्पसंख्याक हक्क दिवस" म्हणून साजरा करण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या सूचना अल्पसंख्याक आयोग व शासनामार्फत जिल्हाधिकारी यांना देण्यात येतात. अल्पसंख्याक हक्क दिवस प्रभावीपणे राबविण्याबाबत लोकप्रतिनिधी व विविध संस्थांकडून मागणी करण्यात येत आहे. अल्पसंख्याक हक्क दिवस प्रत्येक जिल्ह्यात प्रभावीपणे साजरा करण्याच्यादृष्टीने समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

अल्पसंख्याक हक्क दिवस प्रत्येक जिल्ह्यात प्रभावीपणे साजरा करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ४ | जिल्हा पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय | सदस्य |
| ५ | शिक्षणाधिकारी (माध्यमिक/उच्च माध्यमिक), जिल्हापरिषद | सदस्य |
| ६ | जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय | सदस्य सचिव |

अल्पसंख्याक हक्क दिवस प्रत्येक जिल्ह्यात प्रभावीपणे साजरा करण्याच्या अनुषंगाने

जिल्ह्यात अल्पसंख्याक हक्क दिवस व्यापक प्रमाणात साजरा करणे, अल्पसंख्याक हक्क दिवशी राबवावयाच्या कार्यक्रमांच्या नियोजनाची जबाबदारी तसेच अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा केल्याबाबतचा अहवाल महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास सादर करण्याची जबाबदारी या समितीची राहील .

२. संबधित जिल्हाधिकारी यांनी शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/कार्यालयीन आदेश /वित्तीय नियमावली/ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे निरीक्षण अहवाल/वित्तीय कार्यपद्धती यांचा अवलंब करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक क्र. २०२५११२११४४४०५८३१४ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MILIND PADMANABH SHENOY

Digitally signed by MILIND PADMANABH SHENOY
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Minority Development Dep., 2.5.4.20=A45302E7BE40EF2FA6A43CA3B215A6542FE92B8F99495 9680F52A7AE3A293948, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F493AF30AF7B26C53298AE259841E86E196988EEE 98D450625570240B6F3B989, cn=MILIND PADMANABH SHENOY
Date: 2025.11.21 14:45:46 +05'30'

**( मिलिंद शेणॉय )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मंत्री/राज्यमंत्री (अल्पसंख्याक विकास) यांचे खाजगी सचिव
२) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता),मुंबई / नागपूर,
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
५) जिल्हाधिकारी (सर्व)
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व )
७) आयुक्त, महानगरपालिका (सर्व )
८) पोलीस अधिक्षक, पोलीस आयुक्तालय (सर्व )
९) शिक्षणाधिकारी (माध्यमिक/उच्च माध्यमिक), जिल्हापरिषद (सर्व )
१०) सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई
११) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१२) जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
१३) कक्ष अधिकारी (का-९), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) निवड नस्ती, कार्यासन-८